# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

## ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

जावक क्रमांक : यचममुवी/शिष्यवृत्ती/विसेवि/2019-20/ दिनांक : **15.06.2019**

## शैक्षणिक सत्र 2019-20 भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसंदर्भात अभ्यासकेंद्रांसाठी मार्गदर्शक सूचना

- आपल्या अभ्यासकेंद्रावर दर्शनी भागात शैक्षणिक सत्र 2019-20 शिष्यवृत्तीसंदर्भात सूचना प्रदर्शित कराव्यात.
- विद्यापीठाच्या ycmou.ac.in या संकेतस्थळावरील Scholarship Tab मधील सर्वच माहिती/सूचना वाचाव्यात, तसेच scholarship YCMOU या Youtube Channel वरील शिष्यवृत्तीसंदर्भातील दृक-श्राव्य चित्रफितीही बघाव्यात.
- आपल्या केंद्रावर शिष्यवृत्तीसंदर्भात माहिती विचारणा-या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, तसेच विद्यापीठाच्या ycmou.ac.in या संकेतस्थळावरील Scholarship Tab मधील सूचना वाचण्याच्या तसेच scholarship YCMOU या Youtube Channel वरील शिष्यवृत्तीसंदर्भातील दृक-श्राव्य चित्रफिती बघण्याच्या सूचना द्याव्यात.
- विद्यार्थ्याने शासनाच्या https://mahadbt.gov.in/ या संकेतस्थळावरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Government of India Post Matric Scholarship, 2019-20) योजनेचाच ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सूचित करावे.
- मुक्त विद्यापीठात B.A., B.A.(MCJ), B.C.A., B.Com., B.Lib., M.A.(English), M.Com., M.Lib., M.Sc. (Environment Science), & M.B.A. अशा दहा शिक्षणक्रमांच्या प्रवेशार्थी विद्यार्थ्यांनाच सदयस्थितीत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सदर संकेतस्थळाद्वारे भरता येत आहेत.
- विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमास शिष्यवृत्ती योजना लागू आहे किंवा नाही याची प्रथमत: खात्री करण्यास सांगावे. कारण VJNT/SBC/OBC/SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उपरोक्त दहापैकी सर्वच शिक्षणक्रमांना शिष्यवृत्ती सध्या तरी देय नाही.
- शून्य शुल्क अथवा अंशत: शुल्क भरून शिष्यवृत्तीचा पर्याय निवडून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या आवश्यक दस्तावेजांच्या यादीप्रमाणे स्कॅन प्रती आपल्या संगणकात घेतल्याशिवाय अर्ज स्विकारू नयेत.
- शिष्यवृत्ती संकेतस्थळ सुरू झाले असल्यास विद्यार्थ्याने ऑनलाईन सादर केलेल्या शिष्यवृत्ती अर्जाचे प्रिंट आऊट आवश्यक दस्तावेजांसह व Scan Documents सह घ्यावे. संकेतस्थळ सुरू झाले नसल्यास सध्या केवळ Scan Documents घ्यावेत व संकेतस्थळ सुरू झाल्यावर लगेचच आवश्यक दस्तावेजांसह शिष्यवृत्ती अर्ज जमा करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे.
- विद्यार्थ्याने अर्जात लिहिलेला मोबाईल क्रमांक व मेल आयडी सुरू असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्याने पूर्ण भरलेल्या Online अर्जाचे प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करून घेताना अर्जाची सत्यप्रत विद्यार्थ्याने स्वत:जवळ ठेवण्याची सूचना करावी. व सत्यप्रतीवर अभ्यासकेंद्राकडे अर्ज जमा केल्याची पोहोच द्यावी. पोहोच देताना विद्यार्थ्याने कुठल्या मूळ दस्तावेजांच्या स्कॅन प्रती जमा केल्या आहेत त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.
- **विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज भरला म्हणजे त्याला शिष्यवृत्ती मंजूर झाली असे नाही** तर विद्यापीठ मुख्यालय व संबंधित विभाग यांचेमार्फत विद्यार्थ्याने भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची व अपलोड केलेल्या तसेच मेल केलेल्या दस्तावेजांची तपासणी झाल्यानंतर शिष्यवृत्तीस विद्यार्थी पात्र किंवा अपात्र ठरेल. त्रुटी आढळल्यास विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज रद्द होऊ शकतो. याची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी.
- कुठल्याही कारणाने शिष्यवृत्ती अर्ज रद्द झालेल्या विद्यार्थ्याने (त्याने शुल्क भरले नसल्यास) सूचना प्राप्त होताच तात्काळ एकरकमी शुल्क भरणे आवश्यक असल्याची जाणीव विद्यार्थ्याला करून द्यावी.
- विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी असल्यास याबाबत विद्यार्थ्याला कळविले जाणार नसल्यामुळे विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती अर्ज बिनचूकपणे भरण्याची व तसेच आवश्यक त्या दस्तावेजांच्या मूळ प्रती शिष्यवृत्तीच्या संकेतस्थळावर (https://mahadbtmahait.gov.in) अपलोड करण्याचे तसेच विद्यापीठाच्या मेल आयडीवर (scholarship@ycmou.digitaluniversity.ac) मेल करण्याबाबत सूचना द्यावी.
- विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती अर्ज अभ्यासकेंद्रामार्फतच पाठविणे बंधनकारक असल्याचे विद्यार्थ्यास सांगावे.

- विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत अभ्यासकेंद्राने द्यावयाचे प्रपत्र अ पूर्णपणे भरून व केंद्रप्रमुख/ केंद्रसंयोजकांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह अर्जासोबत जोडावे.
- विद्यार्थ्यांना त्यांची संपर्कसत्रांना उपस्थिती 75 % भरणे आवश्यक असल्याची जाणीव अर्ज स्विकारतानाच द्यावी.
- जे विद्यार्थी शिष्यवृत्तीचा अर्ज भरतील अशा विद्यार्थ्यांची संपर्कसत्रांना 75 टक्के उपस्थिती अनिवार्य असल्यामुळे शिष्यवृत्ती अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची उपस्थिती व्यवस्थित नोंदवून त्याप्रमाणे सोबतच्या नमुन्यात उपस्थिती पत्रक व उपस्थिती दाखला देण्यात यावा.
- उपस्थिती पत्रक व उपस्थिती दाखला देताना विद्यापीठ संकेतस्थळावरील नमुन्याप्रमाणे आपल्या अभ्यासकेंद्राच्या लेटरहेडवर बनविणे आवश्यक आहे. (मागील सत्रात ब-याच केंद्रांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील नमुन्याच्याच प्रिंट काढून त्या विद्यापीठ मुख्यालयात सादर केल्या होत्या.)
- Govt. Of India पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही केंद्र शासन यांची आहे. या योजनेसाठीचे निकष भारत सरकार यांनी घालून दिलेले आहेत. भारत सरकार व राज्य सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी बदलांच्या सूचना स्विकाराव्या लागतात. शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या Portal ला तसेच मुक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळाला सातत्याने भेट देण्यास विद्यार्थ्यांनाही सूचित करावे, व आपणही सातत्याने भेट द्यावी.
- शिष्यवृत्तीबाबतची माहिती केंद्रांना वारंवार कळविता यावी यासाठी मागील शैक्षणिक सत्रापासून Whats App चा वापर सुरु करण्यात आलेला असून केंद्रावरील सहका-यांसाठी समूह तयार करण्यात आले आहेत. मात्र अजूनही ब-याच केंद्रावरील सहकारी सदर समूहांमध्ये नाहीत, किंवा समूहातून बाहेर पडले आहेत. सर्वांनी या समूहामध्ये सामील होणे अत्यावश्यक असून समूहाच्या नियमाप्रमाणे समूह सुरु ठेवण्यास मदत अपेक्षित आहे.
- शिष्यवृत्तीसाठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज एकत्रितपणे विभागीय केंद्राकडे/विद्यापीठ मुख्यालयाकडे पाठविताना त्यासोबत अभ्यासकेंद्राचे पत्र देणे आवश्यक असून या पत्रात शैक्षणिक सत्रासह, प्रवर्गनिहाय व शिक्षणक्रमनिहाय अर्जाच्या संख्येचा उल्लेख करणे आवश्यक आहे.
- विभागीय केंद्र/ विद्यापीठ मुख्यालयाकडे शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना शिक्षणक्रमनिहाय व प्रवर्गनिहाय (SC/VJNT/OBC/SBC) वेगवेगळे सादर करावेत
- या सूचनांसोबतच सोबत विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या सूचनाही केंद्रप्रमुख, केंद्रसंयोजक व केंद्रसहायकांनी वाचाव्यात, ही विनंती.
- मागील शैक्षणिक सत्रात काही कारणांमुळे काही केंद्रांकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे शिष्यवृत्ती अर्जांची संख्या कमी होती, मात्र मागील सत्रातील दिलेल्या बऱ्याच सूचना, या शैक्षणिक सत्रात वेळीच दिलेल्या योग्य सूचना, आपल्या शंकांच्या समाधानासाठी विद्यापीठ संकेतस्थळ, whats app समूह, scholarship ycmou हे youtube Channel वरील सूचना यामुळे सर्वच केंद्रांकडून शिष्यवृत्तीसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज अपेक्षित आहेत, याकामी आपण सहकार्य, मार्गदर्शन करालच याचीही खात्री आहे.
- या व्यतिरिक्त आपणास काही मार्गदर्शक सूचना करावयाच्या असल्यास आपण त्या लेखी स्वरुपात टपालाने व scholarship@ycmou.digitaluniversity.ac या mail id वर पाठवाव्यात आपल्या सूचनांचा योग्य आदर करण्यात येईल.

**विद्यार्थ्यांकडून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा अर्ज स्विकारताना व सदर अर्ज सोबतच्या आवश्यक दस्तावेजांसह विद्यापीठात पाठविताना उपरोक्त सूचनांचे पालन करावे, ही विनंती.**

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2019.06.16 16:30:12 +05'30'

**(स्थळ प्रतीवर मा. संचालक, वि.से.वि. यांची स्वाक्षरी आहे)**